## सांईभावदीप.

( नारद भक्ति सूत्रें )

–मंगलाचरणम्–

श्रीगुरु सांइनाथाय तीव्र वैराग्य मूर्तये ।
सच्चिदानंद रूपाय भूयो भूयो नमोनमः ॥ १ ॥

परिच्छेद त्रयातीतमपार तप आश्रयम् ।
वाङ्मनोभ्यामनासाद्यं गुरुपदं नमाम्यहम् ॥ २ ॥

परब्रह्मस्वरूपाय नित्यज्ञानमयायच ।
अचिंत्याय परेशाय सद्बोधाय नमोनमः ॥ ३ ॥

भक्तवात्सल्यहेतुत्वात्संभूताय कृपावते ।
तुभ्यं दयास्वरूपाय सर्वकालं नमोनमः ॥ ४ ॥

अनाश्रयस्य दीनस्य त्वमेव शरणं मम ।
त्वत्प्रसादाद्विना ज्ञानमगम्यं मे दयानिधे ॥ ५ ॥

अतर्क्यायाप्रमेयाय सर्वभूतात्मने नमः ॥
ज्ञानवैराग्य सिध्यर्थं भिक्षां मे देहिसद्गुरो ॥ ६ ॥

गीतार्थबोध कर्तात्वमज्ञानं च्छेत्तुमर्हसि ।
निजस्वभाव कारुण्याद्देहि मे विमलां मतिम् ॥ ७ ॥

गीतार्थस्य विपर्यासः प्रवृत्तोस्ति दिनेदिने ।
हृदयं दीर्यते तेन त्रायस्वजनतां प्रभो ॥ ८ ॥

त्वदन्यः संशयानां म च्छेत्ता नह्युपपद्यते ।
कृपया परयाविष्टं ज्ञानस्फूर्त्याद्य पाहि माम् ॥ ९ ॥

इत्येनां निज दासस्य विज्ञप्तिं शृणु हे विभो ।
गीतार्थ तत्त्वबोधेच्छौ नीलकंठे प्रसीद भोः ॥ १० ॥

## ॥ अथ सूत्रारंभः ॥

**सूत्र १** अथातो भक्तिं व्याख्यास्यामः ॥

**आर्या** भक्तिसुधारस गीतें, सांइ तुझिवा कृपाप्रसादानें
गातों आतां येथुनि, ज्यांचा स्वानंद भोगितीं योगी ॥

**विवरण** " ओंकारश्चाथ शब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा ॥
कंठं भित्वा विनिर्यातौ तेन मांगळिकावुभौ ॥

हा श्लोक सस्कृत कोशामध्ये " **अथ** " ह्या शब्दाच्या व्याख्येंत दिलेला असून त्याचा अर्थ असा आहे कीं " **ओंकार** " आणि "**अथ**" हे दोन शब्द ब्रह्मदेवाच्या ( व्यक्त परब्रह्माच्या ) मुखांतून प्रथमतः निघालेले असून "**ॐ अथ**"रूपी ती आद्य **अपौरुषेय** वाणी मंगलकारक आहे. मौजीबंधनसंस्कारपूर्वक उपनयन (गुरूपसत्ति=गुरुगृहीं वास करण्यास आरंभ) झाले म्हणजे स्वाध्यायास ( वेदपठनास ) सुरवात करतांना शिष्याकडून गुरु प्रथमतः " **हरि ॐ**". असे म्हणवीत असतात. हेंच आद्य मंगलाचरण होय. ह्या मंगलाचरणानंतर होणाऱ्या स्वाध्यायद्वारा प्राप्त होणारी वेद्य (ज्ञेय) वस्तु फक्त " **एक मेवाद्वितीयं ब्रह्म** " ह्या शिवाय अन्य नाहीं, असें " **वेदैश्च सर्वैरयमेव वेद्यः**" (भ. गी. १५—१५) ह्या भगवदुक्तीवरून सिद्ध होतें. त्याच प्रमाणेः—

**वेदे रामायणे चैव पुराणे भारते तथा ॥**
**आदौ मध्ये तथा चांते हरिः सर्वत्र गीयते ॥**

( गजेंद्रमोक्ष )

ह्या श्रीमन्महाभारतस्थ श्रीमद्भगवद्गीतादि शुद्ध ज्ञानदायक भक्तिमय पंचरत्नांतील गजेंद्रमोक्षांतर्गत श्लोकावरून असें प्रस्थापित होतें कीं केवळ वेदानुगामी असलेल्या रामायण, पुराणें व भारत ह्या आद्य प्रमाणग्रंथांमध्ये देखील **आदिमध्यांतीं** प्रामुख्यानें हरिगुणवर्णनाशिवाय अन्य विषय नाहीं.

तथापि ओंकार म्हणजे "एकाक्षरं ब्रह्म" होय (भ. गी. ८-१३); आणि "ब्रह्माक्षर समुद्भवम्" (भ. गी. ३-१५) ह्या भगवदुक्तीप्रमाणें अपौरुषेय वेदब्रह्माची उत्पत्ति त्या अव्यक्तोऽक्षर ब्रह्मापासून (भ. गी. ८-३, २१) झाली असल्याकारणानें प्रत्यक्ष वेदाध्ययनाची सुरवात जशी "हरिः ॐ" ह्या मंगलाचरणानंतर होते, तशी वेदानुगामी पौरुषेय ग्रंथाची सुरवात "अथ" ह्या मंगलाचरणाने होते. हा वैदिक संप्रदाय अनादि आहे; आणि तदनुसार देवर्षिश्रेष्ठ भगवान् श्री नारदानीं आपल्या भक्तिसूत्राचा आरंभ "अथ" ह्या मंगलाचरणाने केला, तो संप्रदायपालनार्थ अवश्यच आहे. वेदपठनाबरोबर सक्रिय वेदार्थ समजून घेण्यास्तव व्यासशिष्य जैमिनीकृत पूर्वपक्षरूपी म्हणजे शंकारूपी मीमांसाशास्त्राचे यथासांग अध्ययन करावयाचें असतें; आणि ते पूर्ण झाल्यानंतर जैमिनीगुरु बादरायणि-तात भगवान् श्रीकृष्णद्वैपायन वेदव्यासकृत उत्तरपक्षरूपी म्हणजे समाधानरूपी वेदान्तशास्त्राचें (ब्रह्मसूत्रांचें) अध्ययन केलें जातें. ह्या सकल श्रुतीतग्रंथांचा आरंभ "अथ" ह्या मंगल शब्दानेंच होतो, असें ब्रह्मयज्ञांतील "अथ शिक्षा प्रवक्षामि" "अथातो धर्म व्याख्यास्यामः," "अथातो धर्म जिज्ञासा" "अथातो ब्रह्मजिज्ञासा" ह्या उक्तींवरून प्रत्येक द्विजाच्या सहजच लक्षांत येईल.

ह्या प्रथमसूत्रांतील "अथ" ह्या मंगलोक्तीपुढचा "अतः" हा शब्द क्रमवाचक असून "येथून पुढें" असा त्याचा अर्थ असल्याकारणानें "कोठून पुढें" असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. अर्थात् "अवश्य करावें पूर्वाध्ययनादि ब्रह्मकर्म संपल्यानंतर" असा सूत्रस्थ "अतः" ह्या शब्दाचा अर्थ आहे, असें त्या शब्दाचें स्पष्टीकरण भगवान् श्री व्यासांनी भारतांतर्गत अनुस्मृतींतील ज्या श्लोकांत केलेलें आहे, तो श्लोक असा आहे:—

"जन्मांतर सहस्रेषु तपो ध्यान समाधिभिः।
नराणां क्षीणपापानां कृष्णे भक्तिः प्रजायते॥"

( अर्थ--श्लोक )

अनंत पूर्व जन्मींचीं। शास्त्रोक्त साधनें जयीं ॥
सफलत्वें क्षया जाती। तेव्हां सद्भक्ति लाभते ॥

हा श्लोक भगवद्गीतेतील ज्या श्लोकाशीं अगदीं समानार्थी आहे तो श्लोक असा आहे:—

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्मकारणमुच्यते ॥
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ भ गी. ६—३

( अर्थ-आर्या )

सात्विक कर्में निपजे सिद्धावस्था पुढें न कर्म उरे ॥
सिद्धाच्या मुक्तीला कारण शम होय नेतरहि कांहीं ॥

अशाप्रकारें शुद्धसात्त्विककर्मफलोन्मुखतेच्या योगाने दैवीसंपत्यात्मक शमदमादि साधनसंपन्न होऊन जन्मास आलेला जो कर्मातीत मुमुक्षु असेल, त्याच्या भक्तिदार्ढ्यासाठीं आणि विकर्माकर्मत्यागपूर्वक शुद्ध भक्तिप्रधान कर्माचरणद्वारा ससिद्धि प्राप्त करून घेण्याची ज्या श्रद्धावान् जिवांना कामना असेल, त्याच्या कामनासिद्धीसाठीं हीं भक्तिसूत्रे केलेली आहेत, असा सूत्रस्थ **अत:** ह्या शब्दाचा अर्थ आहे. परंतु मायेच्या दुर्धर माहामुळें लोकानें प्राय: अधिभौतिक इहफलदायी असत्कर्मेंच इष्ट वाटत असल्याुळ सिद्धिदायक सत्कर्माकडे कोणाचीच प्रवृत्ति होत नाहीं आणि त्यामुळें भगवद्गीतेसारख्य शुद्ध आध्यात्मिक ग्रंथाच्या मिथ्या आधिभौतिकदृष्ट्यात्मक टीका निर्माण होऊन, त्या लोकप्रिय होत आहेत. मायाजन्य बुद्धिमाद्य आणि तन्मूलक दुर्मार्गप्रवृत्ति ह्या हानिकारक आपत्तिद्वयापासून जगाची कायमची मुक्तता करणे प्रत्यक्ष ईश्वरासच इष्ट वाटत नाहीं. म्हणून त्यानें कर्मयोनींतील प्रत्येक जिवाला ( मनुष्याला ) कर्मस्वातंत्र्य देऊन त्याच्या अवनतीचा मार्ग सतत मोकळा ठेविला आहे; आणि ही दुर्मार्गगामी योनी

जगातून अजीबात नष्ट होऊं नये, म्हणून तो युगायुगीं अवतार घेऊन तिची तात्पुरती घडी जमवीत असतो असे म्हणणें भाग आहे. ह्यास्तव देवाचे कार्य देवाकडे सोपवून ज्ञानी पुरुष दुष्ट जनसंघाचा त्याग करितात, आणि आरण्यवासात कालक्रमण करितात. हीं ज्ञानलक्षणे ज्याना ज्ञानसाधने वाटत नाहींत, त्याच्याकरिता भगवद्गीता नाहीं व हीं सूत्रही नाहींत. ह्या आद्य सूत्रांत भगवान् श्री नारदांनीं आपले स्वीकृत कार्य करण्याची शास्त्रसंपदायानुसार प्रतिज्ञा केली आहे, इतकाच सूत्रार्थ आहे.

**सूत्र २** सा त्वस्मिन् परम प्रेमरूपा: ॥

**आर्या.** क्षेत्रज्ञाच्या ठायीं, प्रेमातिशयासि भक्ति नाम असे ।
सर्व क्षेत्रीं साई, क्षेत्रज्ञ अशी प्रतीति मज आली ॥

**विवरण.** ह्या सूत्रात सकल पुण्यकर्मसाफल्याने ईश्वरप्रसादद्वारा संसिद्धि प्राप्त झालेल्या अति दुर्लभ अशा कर्मातीत सिद्ध पुरुषाची जी केवल व्यवसायात्मिका (परमेश्वरैकनिष्ठ) बुद्धि असते, तोच भक्ति होय,, अशी भक्तीची व्याख्या केली आहे. "**आधार: सर्व भूतानां प्रसीदतु स नो हरि:**" ह्या मंत्रातील सर्वभूतांतरात्मारूपी सर्वभूताधार असलेला जो क्षेत्रज्ञ जनार्दन वासुदेव श्रीहरि सज्ञक जडावगुंठित जीव, तोच सूत्रस्थ "**अस्मिन्**" ह्या पदाचा अर्थ असून त्याच्या शिवाय सर्व भूतें निराधार म्हणजे नि:सत्त्व मिथ्या) आहेत, असे न्यायतःच सिद्ध होत असल्यामुळे, त्याच मंत्रानें "**जीवो ब्रह्मैव ना पर:**" हा सिद्धांत सहजच प्रस्थापित होतो. "**सजीव**" हा शब्द "**चिज्जडग्रंथि**" दर्शक आहे. त्यातील षड्विकारी जडांश (देह) चिन्मय जीव नव्हे, अशी खात्री झाली, म्हणजे जीवब्रह्मैक्यता सहजच होते. "**अर्जुनपण न घेतां । मी ऐसें जें पंडुसुता ॥ उठतसे तें तत्त्वता । तयाचें रूप ॥**" (ज्ञानेश्वरी १८. १३१५); व "**परम आवडि आपुलि**

आपणा । वळख तूं तुज, टाकुनि मीपणा ॥" (वामनी प्रिन्हुदा) ह्या उभयोक्तीतील आत्मस्वरूपाचे वर्णन पहिलें, तर तोच सिद्धांत निश्चित होऊन जीवेशैक्यभावोद्भूत जे आत्मप्रेम (आत्मरति) तीच खरी भक्ति होय, असे ठरते. "पैं माझिये सहजस्थिति भक्तिनाम" (ज्ञानेश्वरी १८.११३३) ह्या व्याख्येप्रमाणेही आत्मज्ञानपूर्वक जी आत्मरति तीच खरी भक्ति होय; आणि "चहूंपुरुषार्थाशिरीं । भक्ति जैशी ॥ (ज्ञानेश्वरी १८. ८३७) ह्या उक्तीने "आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति" हा श्री याज्ञवल्क्यांचा सिद्धान्त अबाधित ठरून ज्ञानोत्तर आत्मरति, हेच मनुष्याचें अन्तिम साध्य आहे, असे कबूल करावे लागते.

आतां "बुद्धि" ह्या शब्दाच्या अर्थाचा विचार करूं म्हणजे "व्यवसायात्मिका बुद्धि" कोणती तें सहजच कळेल. अंतःकरणाच्या संकल्प विकल्पात्मक वृत्तीला "मन" अशी पारिभाषिक संज्ञा असून त्याच्याच निश्चयात्मिका वृत्तीला "बुद्धि" असे म्हणतात. विषयभेदेकरून बुद्धीचे निश्चयहि सहजच भिन्न भिन्न होत असतात; आणि सहजत्वे भिन्न निश्चयात्मिका असलेल्या बुद्धीला "अवसायात्मिक" अशी संज्ञा असून ती जेव्हां "विशिष्ठ निश्चयात्मिका" म्हणजे आत्मैकनिष्ठ (भगवदेकनिष्ठ) होते, तेव्हांच तिला "व्यवसायात्मिका" म्हणतात; कारण "व्यवसाय" हा शब्द "साय" ह्या शब्दामागें प्रथम "वि" आणि नंतर "अव" असे दोन उपसर्ग लागून झालेला आहे; व "साय" ह्या शब्दाचा अर्थ "अंत" (termination) असा असून "अवसाय" ह्या शब्दाचा अर्थ "अंत लावणें" (determination) असा होतो, व "व्यवसाय" ह्या शब्दाचा अर्थ वेदान्त (determining the finaltrthu) असा आहे: आणि ह्याच कारणास्तव "वेदैश्चसर्वैरहमेव वेद्यः" (भ. गी. १५-१५) ह्या भगवद्वाक्यनुसार विष्णुसहस्रनामांत "व्यवसाय" हें महाविष्णूचें ३८४ वे नांव असून

**सच्चित्सुखरूपचि हा, ऐसें निर्धारितात वेद जया ।**
**यास्तव वेदज्ञानीं, दिधले व्यवसाय हेंच नाम तया ॥**
( नामार्थ दीपिका )

भगवद्गीता, अध्याय १०, श्लोक ३६, ह्यात **"व्यवसायोस्मि"** असे म्हणून भगवान् श्रीकृष्णानीं सकल बुद्धिनिश्चयांत भगवदेकशरणतेलाच श्रेष्ठ स्थान दिले आहे. **"व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह"** (भ. गी. २-४१) ह्या उक्ती-नेंहि फक्त एका परमात्मपर बुद्धीलाच **"व्यवसायात्मिका"** हे नाव शोभतें असे सांगून तदितर स्वर्गपरादि बुद्धि असणाऱ्या सकल लोकांना **"अव्यवसायी"** म्हटले आहे. ह्या **"अव्यवसायी"** शब्दाचा अर्थ **"मिथ्यैष व्यवसायस्ते"** ( भ. गी. १८-५९ ) ह्या उक्तीप्रमाणें **मिथ्या व्यवसायी** असाच होतो, व ह्यामुळेही शुद्ध परमात्मपर नसलेली अवसायात्मिका बुद्धि केवळ मिथ्या व्यवसायात्मिका असते, असे म्हणणे प्राप्त आहे. त्याचप्रमाणें संकल्प-विकल्पात्मक वृत्तिरूप मनाचा अंतःकरणांत उद्भव होण्याच्या पूर्वीची जी अतिबाल्यावस्थेतील अंतःकरणाची वृत्तिरहित स्थिति असते, तिलाच सहज-समाधि असें नाव आहे; व **"मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः"** (अमृतबिंदु उपनिषत् ) ह्या श्रुत्यन्वयें आणि गीतान्वयेंहि **मनोनाश** हे मुक्तीचें साधन आहे, इतकें ध्यानांत ठेवलें म्हणजे **"भोगैश्वर्य प्रसक्तानां तयापहृतचेतसाम् । व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते"** (भ. गी. २-४४) ह्याचा सत्यार्थ "भोगैश्वर्यलोलुप ज्याचें मन आहे, अशा पुरुषांच्या अंतःकरणांत (समाधौ) व्यवसायात्मिका ( शुद्धपरमात्मपर ) बुद्धि ठरत नाहीं" असा आहे, हा बोध होऊन '**बुद्धि**" ह्या शब्दाच्या अर्थाविषयीं सर्व संशयांचें निरसन होईल. **"ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव ना परः"** ह्या अखिल वेदांतसारभूत उक्तीप्रमाणे विचार केला असता सर्वोपनिषदार्थ निरूपिणी, व अद्वैतामृत वर्षिणी असलेल्या भगवद्गीतेने बुद्धाच्या क्षरभाव आधिभौतिक विषयनिश्चयास **"सनिश्चय"** म्हणणें सर्वथैव असंभवनीय आहे, हें खरें गीतारहस्य जाणून श्री ज्ञानेश्वरांनीं गीतेंताल **"व्यवसायात्मिका"** ह्या पदाचा अर्थ **"जियेसी परमात्माचि अवधि"**

असा केला असून शंकरभाष्यातील त्या पदाच्या अर्थनिरूपणाचे सारही तसेच आहे; कारण तद्विपरीत असलेले सकल अर्थ मिथ्यार्थ होत, असें **"युक्त आसीत मत्परः"**इत्यादि अनेक भगवदुक्तींवरून निःसंशय सिद्ध होतें. निर्गुण ब्रह्मात्मैक्यज्ञानद्वारे अथवा सगुण जीवेशैक्यज्ञानद्वारे प्राप्त झालेली **व्यवसायात्मिका** बुद्धि, ही तत्त्वतः आत्मरतीहून भिन्न नसल्यामुळें **"पै माझिये सहजस्थिति। भक्ति नाम"** ( ज्ञानेश्वरी १८ ११ १२ ) ही भक्तीची व्याख्या उत्तमोत्तम ठरून, सहज स्थिति ही काममूलक असणे सर्वथा असंभवनीय असल्या कारणानें खरी उच्च भक्ति सहजच **निष्काम** असणार, ह्यात संशय नाहीं; परंतु बुद्धि व्यवसायात्मिका होण्यास जे क्रियमाण सत्कर्म कारणीभूत असते, ते सर्वथैव निष्काम असणे असंभवनीय आहे, असा शास्त्रसिद्धांत आहे.

आता संसिद्धिदायक (भ गी. ३-२०) प्राक् कर्माचा विचार करूं, म्हणजे तदनुषंगानें इतर कर्माचाहि विचार सहजच होईल. परंतु हा कर्मविचार आम्हीं भगवद्गीतेच्या आधाराने करणार आहो; आणि भगद्गीतेंतील बोधाचा प्रत्यक्ष भगवान् श्रीकृष्णांनींच अर्जुनाला पुढे अनुगीतेंत जो अन्य-प्रकारे स्पष्टार्थ सांगितला आहे, तदनुरोधाने भगवद्गीतेचा अर्थ न केल्यास तो दूषित ठरणार, कारण **अनुगीता ही प्रक्षिप्त नाहीं,** असे " भांडारकर रीसर्च इंस्टिट्यूट "ह्या संस्थेच्या विद्वान् तज्ज्ञ चालकानीं आता पूर्ण तपासाअंतीं निश्चित केले आहे. आतां प्रथमतः अनुगीतेतील काहीं मुख्य प्रश्नांचा स्वतंत्र विचार करूं.

(१) **अर्जुन** अनुगीतारंभीं आपले ज्ञानविहीनत्व स्वतःच कबूल करितो, ते असेः—

**" यद्भगवता प्रोक्तं पुरा केशव सौहृदात् ॥**
**तत्सर्वं पुरुषव्याघ्र नष्टं मे भ्रष्ट चेतसः " ॥**

अनुगीता १६-६

(३) जो सर्वकर्मसंन्यास अपरिहार्य प्रारब्धकर्मफलभोगानंतर मोक्षार्थ करावयाचा असतो, त्याची महति अनुगीतेत भगवान् श्रीकृष्णानीं अर्जुनाला अशी सागितली आहे:—

" ज्ञानं त्वेव परं विद्यः संन्यासं तप उत्तमम् "

( अ. गी. ३५-१६ )

ह्या उक्तीचा जो स्पष्टार्थ भगवद्गीता अ. ४, श्लो. ३८ आणि अ. १८, श्लो. ४९ ते ५५ ह्यात केला आहे, त्यावरून मोक्षप्राप्ति करून घेण्याचे जे आद्य कर्तव्य ते संन्यासाशिवाय साधत नाहीं, असें "संन्यासे-नाधिगच्छति" ह्या निःसंदिग्ध उक्तीवरून स्पष्टपणे सिद्ध होतें.

"ब्रह्मचारिकमेवाहुराश्रमं प्रथमंपदम् । गार्हस्थ्यं तु द्वितीयं स्याद्वान प्रस्थमतः परम् । ततः परंतु विज्ञेयमध्यात्मं परमं पदम् ॥"

( अ. गी. ३५-४० ) ह्या उक्तींतील आश्रमपरंपरा भगवद्गीतेस प्रमाण असलेल्या मनुस्मृतींतील ( भ. गी. ४-१ व १६-२४ ) असून तिच्यांत संन्यासाश्रमाला " अध्यात्म " म्हणून सर्वश्रेष्ठ पददायक तोच आहे, असें सागितलें आहे. मग तो ज्ञानमार्गी पुरुषाचा स्वरूपसंन्यास असो, अथवा भक्तियोगी पुरुषाच्या अंतःसंन्यास असो, बाह्य वेषांतराशिवाय त्या दोहोंत भेद नाहीं.

"प्रवृति लक्षणो योगो ज्ञानं संन्यास लक्षणम् । तस्माज्ज्ञानं पुरस्कृत्य संन्यसेदिह बुद्धिमान् । संन्यासी ज्ञानसंयुक्तः प्राप्नोति परमां गतिम् ॥" (अ. गी.४३-२६ ) ह्या श्लोकात ज्ञानमार्गी पुरुष आणि भक्तियोगी सिद्ध ह्यांचीं आद्यस्वरूपलक्षणे सांगून "निस्त्रैगुण्य म्हणजे सर्वारंभ परित्यागी (भ. गी. १४-२५), निर्द्वंद्व, नित्यसत्त्वस्थ, निर्योगक्षेम, आणि आत्मवान् (भ. गी. २-४५)," असा अगदीं पक्का संन्यासी झालेल्या योग्यालाच ब्राह्मीस्थिति नामक मुक्तिलाभ होतो ( भ. गी. २-७२) असे म्हटलें आहे.

( अर्थ-आर्या )

" जे जें ज्ञान मला हो, युद्धारंभीं तुझ्या कृपे कळले ॥
ते भ्रष्टचित्त मीं जी, विसरुनि गेलों असे सख्या कृष्णा ॥"

शिवाय गीतोपदेशानंतर युद्धप्रसंगीं स्वतः श्रीकृष्णांनीं अर्जुनाची ज्ञानविहीनत्वाबद्दल केलेली निर्भत्सना गीतारहस्य, पृष्ट ३९, पंक्ति ११, ह्यात जी दिली आहे ती अशी आहे. "तूं मूढ आहेस, तुला तुझा धर्म अद्याप कळत नाहीं." अर्थात् गीतोपदेश ज्ञानी पुरुषास केलेला नाहीं; कारण ज्ञानी पुरुषास उपदेश ( भ. गी. ७-१८ ) करणे हे स्वस्कंधारोहण न्यायानें मूर्खपणाचे लक्षण होय.

( २ ) गीता तात्पर्य स्वतः श्रीकृष्णानीं अनुगीतेत असें सप्रयोजन सांगितलें आहे:—

"श्रावितस्त्वं मया गुह्यं ज्ञापितश्च सनातनम् "
धर्मं स्वरूपिणं पार्थ सर्वं लोकांश्च शाश्वतान् ॥ १६-९ ॥
सहि धर्मः सुपर्याप्तो ब्रह्मणः पदवेदने ॥ (१६-१२)

( अर्थ--आर्या )

"धर्मज्ञान सनातन, अति गुह्य असोनि देत जें मोक्ष ॥
ते शाश्वत लोकांसह कथिलें मद्भक्त व्हावया मुक्त ॥"

अर्थात् अपरिहार्य असलेलें प्रकृति निर्मित ( भ. गी. १८-५९ क्षरभाव आधिभौतिक कर्म (भ. गी. ८-४ ) प्रथमतः संपवून नंतर क्षेत्रक्षेत्रज्ञज्ञानद्वारा ( भ. गी. १३-२ ) परमगति प्राप्त करून घेणें (भ. गी. १३-२४ ) हेंच कार्य तें मनुष्याचें आद्य कर्तव्य होय (गीता रहस्य. प्रस्तावना, पृष्ट ७, पंक्ति १६-१७), असें भगवान् श्रीकृष्णाचें मत ह्यापूर्वी दिलेल्या तदुक्त गीता तात्पर्यावरून स्पष्ट दिसतें.

" गृहस्तो ब्रह्मचारी वा वानप्रस्तोथवा पुन. । य इच्छेन्मोक्षमास्थातुमुत्तमां वृत्तिमाश्रयेत् ॥ अभयं सर्व भूतेभ्योदत्वा नैष्कर्म्यमाचरेत् ॥ " (अ. गी ४६.१७-१८ ) ह्या श्लोकांत " नैष्कर्म्यसिद्धिं परमां सन्यासेनाधिगच्छति" इत्यादि "ततो मां तत्वतो ज्ञात्वा विशते तदनंतर" इत्यंत ( भ. गी. १८-४९ ते ५५ ) भगवद्गीतोक्तीचा पुनः एक वार संक्षेपतः अनुवाद करून संन्यासाशिवाय परमपदप्राप्ति होत नाहीं, असे म्हटले आहे.

"तपसा क्षेममध्वान गच्छंति परमेश्वरं । संन्यास निरता नित्यं ये च ब्रह्मविदो जनाः । ज्ञानं वै परमं विद्यात्संन्यासं तप उत्तमम् ॥" (अ. गी. ४७. ४ व ५ ) ह्या श्लोकांत **संन्यासरूप श्रेष्ठ तपानें** " **प्रज्ञानं ब्रह्म** " ह्या ऋग्वेदाच्या ऐतरेयारण्यकोपनिषदांतील महावाक्याचे तदितर महावाक्यासह ज्ञान होऊन जीव मुक्त होतो, असें सांगितलें आहे.

( ४ ) **लोकसंग्रह** हे कार्य " **नराणां च नराधिपम्** " ( भ. गी. १०-२७ ) ह्या उक्त्यन्वयें जो प्रजापालनाधिकारी "श्रेष्ठः" ( भ. गी. ३-२१ ) असेल त्याने राजा जनक, वृष्णिश्रेष्ठ भगवान् वासुदेव श्रीकृष्ण ( भ. गी. ३-२० ते २४ ), ह्यांच्याप्रमाणें प्रारब्धकर्मक्षयापर्यंत केलें पाहिजे; राजाधिकाराभावी इतरांची आज्ञा सर्वत्र **प्रमाण** होणें शक्य नाहीं; असा उपदेश भगवद्गीतेंत अर्जुनास केलेला आहे, ह्याचे इतकेंच कारण आहे कीं, त्या युद्धप्रसंगीं पांडवश्रेष्ठ अर्जुनाच्या प्रारब्ध कर्माचा क्षय झालेला नव्हता. तो झाल्यानंतर त्यालाच पुढे स्वतः भगवान् श्रीकृष्णांनीं लोकसंग्रहासंबंधीं अनुगीतेंत जो उपदेश केला, तो असा आहे.—

( अपूर्ण )

# रामनवमी

( मागील अंकावरुन पुढे चालू )

एकदा श्री महाविष्णु वैकुंठीं रमेसह एकातात बसले असतांना सनत्कुमार दर्शनाला आले; परंतु महाविष्णूचे द्वारपाल जयविजय यांनीं देव एकांतांत असल्यामुळे त्याना आंत जाण्याविषयीं प्रतिबंध केला. सनत्कुमारानीं त्यांना तीन वेळा आत वर्दी देण्याविषयीं सांगितले, परंतु "ही दर्शनाची वेळ नव्हे " असा रोखठोक जबाब त्यानीं दिला. तेव्हा संतापून सनत्कुमारानीं जयविजयाना शाप दिला कीं, तुम्हीं भूलोकीं असुर कुलात जन्म घेऊन गो-ब्राह्मणाना छळाल. ऋषींच्या शापाप्रमाणे दोघानीं असुर कुलीं जन्म घेतले.

**ओवी**

**ते हे रावण कुंभकर्ण । मातले महीतलीं पूर्ण ॥**
**देव बंदींत घालून । यजनयाग विध्वंसिले ॥**

असुर कुलात जन्म व गोब्राह्मणाना छळण्याबद्दलचा शाप, मग त्यांच्य लीलांना काय विचारावयाचें. ऋषीजनांना रावणानें त्रस्त करून सोडले.. त्याचे यज्ञयाग विध्वंसून टाकिलें. पृथ्वीवर कोठेही पुण्यकर्म होईनासें झाले.. शक्तीच्या बळावर देवादिकांशीं युद्ध करून त्याना पादाक्रांत केले. रावण असुर होता तरी श्री शंकराचे ठिकाणीं त्याची अढळ भक्ति होती. खडतर अनुष्ठानें करून त्याने शंकरांना प्रसन्न करून वर मिळविले होते; परंतु त्या वरांचा सदुपयोग न करितां त्यानें दुरुपयोग मात्र केला. एकदां तर शंकराकडून वर मिळवून त्या वराच्या जोरावर पार्वती मातोःश्रीलाच पळविण्याचा रावणानें घाट घातला होता, परंतु श्रीविष्णूच्या मदतीनें भोळ्या महादेवावरील त्या संकटाचें निरसन झालें.

**पद.**

**लाधली शिवाच्या वरें संपदा ज्याला ।**
**परि असुर भावतो किमपि नसे पालटला ॥**
**गुरु सूर्य शनीच्या करून पायऱ्या ज्यांनी ।**

वेदांचि पाडिलीं पदें असा जो ज्ञानी ॥
पंचांग विधीतो सांगे त्याजला ।
नापिक तिथें मल्हारी जाहला ॥
ध्यावया धुणें नेमिलें सटवीला ॥
गणुदास म्हणे ना पार तदीय भाग्याला ।
परि अनितीरूप केतुनें सूर्य तो गिळिला ॥

गुरु, सूर्य, व लोकांच्या राशीला लागणाऱ्या शनीसारख्या वक्रतर ग्रहांना रावणाने जिंकून आपल्या सिंहासनाला त्यांच्या पायऱ्या केल्या; ब्रह्मदेवासारख्या ज्ञात्याला पंचाग सांगणाराचें काम दिलें; मल्हारीची नापिक कर्मावर योजना केली. सटवीला धुणें धुवायला लावले. अशा रीतीनें तो मदोन्मत्त असुर सर्वांना असह्य झाला. बिचारी पृथ्वी तर रावणाच्या अनन्वित पापाचरणानें त्रस्त होऊन गेली. शेवटीं तिनें धेनूचें रूप घेऊन व मोठ्या कष्टाने ब्रह्मदेवाला शरण गेली.

आर्या

धेनु होऊन भूमी विधिमुनिसह क्षीरसागरा गेली ।
लोचनीं ढाळून पाणी अवशमना बाहती मुखें झाली ॥

ब्रह्मदेव धेनूला बरोबर घेऊन देवादिकांसह व मुनीजनांसह श्री मह विष्णूकडे गेले व रावणाचीं दुष्कृत्ये त्याना निवेदन केलीं. रावण सर्व त्रलोक्याला पीडा देत आहे, हे ऐकून महाविष्णूंनीं भूलोकीं अवतार घेण्याचें ठरविलें व भूमीला आश्वासन दिलें.

पद.

मी भार हरिन गे तव सांचा ॥ धृ० ॥
रघुवंशामध्यें जन्म धरोनी । करीन खचित निःपात ।
जाण त्या असुराचा ॥ १ ॥
कमला होईल जनक कुमारी । शंखचक्र हे येतिल उदरीं ।
त्या कैकयीच्या कीं निर्धारी । शेष होईल बंधू ॥
लक्षुमण नांवाचा ॥ २ ॥

ओवी.

देव होतील वानर । मारुती भगवान शंकर ।
सेतु बांधोनी निधीवर । संहारीन रावणातें ॥

रावणाचा वध करण्याकरितां महा विष्णूला केवढी तयारी करावी लागली यावरून तो मदोन्मत्त किती बलवान होता ते पहा. शेष, शंख व चक्र याना आपले बंधू, भगवान शंकराना मारुती व देवांना वानर, असे अवतार घेण्यास सांगून, महाविष्णूंनीं स्वत: श्रीरामचंद्राचा अवतार घेण्याचें निश्चित केलें. कलहाचे मुख्य कारण रमा होईल व तिच्यामुळे राक्षसांचा वध होईल म्हणून लक्ष्मी जनक राजाची अयोनिसंभव कन्या झाली; अशा रीतीनें सर्व वैकुंठ भूलोकीं अवतरलें. महाविष्णू ज्या कुलात अवतार घेणार तेही तसेच महान् योग्यतेचे असले पाहिजे, त्याकरिता आदिनारायणापासून उत्पन्न झालेल्या इक्ष्वाकु कुलात राजा दशरथाचे पोटीं रामचंद्राचा अवतार झाला. एके वेळीं रावण व ब्रह्मदेव बोलत बसले असतांना, रावणाने विचारले,

ओवी

विधात्यासि पुसे रावण । मम मृत्यु कवणा हातून
करावें तें मजला कथन । सावधान होईन मी ॥

ब्रह्मदेवानीं सांगितले कीं, राजा दशरथाची ज्येष्ठ पत्नी कौसल्या हिच्या उदरीं साक्षात् भगवान् महाविष्णू हे रामचंद्राचा जन्म घेऊन तुझा संहार करतील व आजपासून पाचव्या दिवशीं दशरथकौसल्या यांचा विवाह होईल. विधात्याचे हे शब्द ऐकून रावण क्रुद्ध झाला व लागलीच पुष्पक विमानांत बसून अयोध्येला गेला. त्या वेळीं राजा दशरथ शरयू नदींत नौकाविहार करीत होता. रावणाने एका लाथेनें त्याची नौका फोडून टाकली. पण सुदैवाने दशरथ राजा न बुडतां त्याला एक लांकडाची फळी सांपडली व तिला धरून तो जलप्रवाहाबरोबर वाहवत भागीरथींत व नंतर समुद्रात गेला. आयुर्मर्यादा बलवत्तर असल्यामुळे त्याला कांहींही इजा न होतां वाहत वाहत तो एका ओसाड बेटाच्या किनाऱ्याला लागला. दशर-

थाची नौका बुडविल्यावर रावण कोसल देशास गेला व युद्धात राजाला जिंकून त्याने कौसल्येचे हरण केलें व तिला एका पेटींत घालून तो दुष्ट आकाश मार्गाने लंकेला चालला. समुद्र ओलंघित असताना त्याच्या मनांत विचार आला कीं, ही पीडा लंकेला कशाला न्यावी ? यावी समुद्रात टाकून व त्याप्रमाणे त्याने पेटी समुद्रांत सोडून दिली.

ओवी

मंजुषा सोडून सागरांत । रावण झाला निश्चित ।
आतां केवीं संहारील मजप्रत । कौसल्योदरीं जन्मुनी ॥

त्या मूर्खाला काय माहीत कीं विधिघटना कधीं टळावयाची नाहीं. समुद्रांत पेटी पडली त्या वेळीं तिमिंगल नांवाचा एक बलाढय मत्स्य तेथून जात होता. त्याने ती पेटी तोंडात धरली व घेऊन चालला. समोरून त्याला दुसरा एक मोठा मासा येताना दिसला. त्याच्याशीं युद्ध करावे लागणार म्हणून तिमिंगलाने पेटी जवळच्या बेटावर टाकली व तो पाण्यात निघून गेला. त्याच बेटाच्या किनाऱ्यावर दशरथ उतरला होता. पेटी दृष्टीस पडल्यावर दशरथ राजाने ती उघडून पाहिली तों आत कौसल्या. दोघांना अत्यानंद झाला. लग्नाकरिता जो शुभ मुहूर्त धरला होता तोच तो दिवस होता. ईशकृपेनें भयंकर संकटातून दोघे निभावून त्याच मुहूर्तावर त्यांची भेट झाली म्हणून राजा दशरथानें त्या निर्जन बेटावर कौसल्येचें गांधर्व विधीनें पाणीग्रहण केलें. त्याबरोबर ब्रह्मदेवानें रावणाचे दरबारात "पुण्याहम्" म्हणून टाळी वाजविली, व तो म्हणाला,

ओवी

सावधान सावधान । शुभ मंगल सावधान ।
केलें दशरथें पाणिग्रहण । कौसल्येचें सुमुहूर्ती ॥
ब्रह्मलिखित कधि न टळे । प्रयत्न होती त्यापुढें दुबळे ।
दांपत्य जरी सागरीं बुडविलें । मीलन झालें निर्जनवनीं ॥

लंकेश्वरा, दशरथ कौसल्येला पाण्यांत बुडवून तूं कृतकृत्य झालास असें तुला वाटेल, परंतु ठरलेल्या मुहूर्तावर आतांच त्या दोघांचा विवाह झाला म्हणून मी

टाळी वाजविली. रावणाचा त्यावर विश्वास बसेना म्हणून दूताकडून ती पेटी आणविली व उघडून पाहतो तो आत दशरथ व कौसल्या. रावणाचा क्रोध अनिवार होऊन त्याने लगेच खड्ग उपसले तेव्हा ब्रह्मदेवानीं त्याला उपदेश केला कीं, रावण, त्याना मारण्याचे घोर पातक तूं करूं नकोस. दोघाना मारण्याचा तू एकदा प्रयत्न केलास तो विफल होऊन त्याचें लग्नही झालें. ब्रह्मलिखित चुकणार नाहीं. त्याचा शिरच्छेद करण्याचा प्रयत्न करशील तर पुढचे मरण आजच तूं आपणावर ओढून घेशील; त्याना मुलगा होईल व पुढे तो तुला मारावयास येईल त्याला पुष्कळ काळ आहे. तेव्हा दोघाना नूं अयोध्येत पोहोंचते कर. रावणाला तो उपदेश पटला व त्याने दशरथ राजाला कौसल्येसह अयोध्येस पोहोचवून दिले. नंतर दशरथ राजाने मगध देशच्या राजाची सुमित्रा नावाची कन्या वरिली व काहीं दिवसानीं कैकेय राजाची कन्या कैकेयी इचे पाणिग्रहण केलें. परंतु,

पद.

**भार्या तीन जरी वरिल्या। पुत्रप्राप्तीविण चैन पडेना दशरथ भूपाला॥**
**गति ना निपुत्रिका वदती। एकमतानें शास्त्रकार हा निर्णय ठरवीती॥**
**स्वर्गीं पितृगणादि प्रति। तर्पण पिंडे मिळूनि तयांना लाभे कविं शांति॥**
**चिंता रात्रंदिन त्याला। पुत्र प्राप्तीविण ०॥**

पुत्रप्राप्तीविणे राजा नेहमीं उदास असे त्यामुळे तो आपला काळ मृगयेंत घालवूं लागला एकदां सबंध दिवसात त्याला सावज मिळालें नाहीं. तेव्हां रात्रींच्या वेळीं पाणवठ्यावर तरी एखादें सावज मिळेल म्हणून तो झाडावर शरसंधान करून बसला. त्या रस्त्याने महान् पितृभक्त श्रावण आपल्या मातापित्याला कावडींत बसवून काशीयात्रेला घेऊन चालला होता.

**घेऊन स्कंधि कावडी पुत्र श्रावण।**
**काशीस चालला मायबाप घेऊन॥**
**झाडि जंगल मोठी दाट वाट उमगेना।**
**रात्रिचा समय मातेचा शोष राहिना॥**

श्रावणा आम्हाला फार लागली तहान । जल आण ॥
देहास सोडुनि पाहें निघाला प्राण । मनिं आण ॥
वाटेंत होईल ही काशी जला वांचुन ।
आण पाणी जपुन तूं मुला कठीण कानन ॥

उन्हाळ्याचे दिवस म्हणून श्रावण आपल्या आईबापाना घेऊन रात्रीं मार्गक्रमण करीत असे. श्रावणाच्या आईला फार तहान लागली व तिचा जीव व्याकुळ झाला. तेव्हा कोठून तरी पाणी आणण्यास तिने श्रावणास सांगितले. श्रावणाने कावड जमीनीवर ठेऊन तो पाणी आणण्यास तडागावर गेला व झारी भरण्याकरिता पाण्यात बुडविली. तेथून जवळच दशरथ राजा शरसंधान लावून बसलेला होता.

पद

बुडबुड ध्वनि झारीचा श्रवणिं ऐकूनी ।
प्रेरियला दशरथें किं बाण तत्क्षणीं ॥
त्या बाणें श्रावण तो विव्हल जाहला ।
राम राम म्हणून भूमि लोळूं लागला ॥

श्रावणाच्या तोंडचे 'राम राम' हे शब्द ऐकून दशरथ राजाला आपल्या हातून अनुचित कर्म घडले असे वाटून तो भीतिग्रस्त झाला.

ओवी

ऐकून ती मनुज वाणी । दशरथ साशंक झाला मनीं ॥
स्वस्थान तें सोडोनी । सन्निध त्याच्या पातला ॥

पाहातो तों श्रावणाला मर्मी बाण लागून तो तळमळत होता. दशरथ राजानें बाण उपसून काढला व आपल्या हातून नकळत अपराध घडल्याबद्दल श्रावणाजवळ क्षमेची याचना केली. बाण वर्मी लागलेला तेव्हां श्रावणाला आपला मृत्यु समीप आला हें कळून चुकले. त्यानें राजाला क्षमा केली व जवळच आपलीं अंध मातापिता कावडींत आहेत, मातोश्रीला फार तहान लागली आहे, तेव्हा ही झारी त्यांच्याकडे घेऊन जा व त्यांना उदक पाज

असे राजास सांगून श्रावणाने प्राण सोडला. दशरथ राजा मोठ्या कष्टानें श्रावणाच्या अंध मातापित्याजवळ गेला व काहीं न बोलता मातेच्या हातात पाण्याची झारी दिली; परंतु श्रावण बोलला नाहीं म्हणून ती पाणी पिईना. बाळ बोलत का नाहींस असे तिनें श्रावणाला विचारले.

पद

कां रे अबोला तरी। मनि धरिलास ये अवसरी।
वाहिलें तुजला मी उदरीं। त्याचि फेड कां ऐशापरी॥

वृद्धा पाणी घेईना, तेव्हा दशरथ राजाला ती करुणजनक हकीगत सांगावी लागली.

श्लोक

गेला श्रावण सोडुनी महितला वैकुंठ लोकांप्रती।
झाला घात तदीय हो मम करीं ज्ञानांध मी भूपती॥
आतां पुत्र तुम्हास मीच समजा शंका न घ्यावी मनीं।
जें कांहीं घडतें न कारण तया कोणी हरी वांचुनी॥

पुत्रनिधनाची वार्ता ऐकल्याबरोबर त्या वृद्धांना अति शोक झाला. राजानें परोपरीनें त्याची समजूत केली, झाल्या अपराधाबद्दल क्षमा मागितली, व मला आपला पुत्र आतां समजा, मी आपली सेवाचाकरी करीन असें आश्वासन दिलें. परंतु पुत्रशोक त्या वृद्धांना असह्य झाला व त्यांनीही 'हा बाळ, हा बाळ,' असे म्हणत प्राण सोडला. प्राण सोडतेवेळीं राजाला शाप दिला कीं, हे राजा जसा पुत्रशोकाने आम्हाला मृत्यु आला तसाच तूंही पुत्रशोकानें मरशील.

पद.

पुत्र पुत्र करुनि नृपा आमुच्या परी।
त्यजिशिल तूं प्राण खचित जाण भूवरी॥ ध्रु०॥
वृद्धांची टाकिलीस काठी मोडुनी।
दाउं नको कृष्णवदन जाय येथुनी॥

**त्यजिले ते प्राण असे त्यास बोलुनी ।**
**पुत्रशोक वृद्धा नच साहे क्षणभरी ॥ पुन० ॥**

राजाला झालेला प्रकार पाहून अति दुःख झालें, पण त्यांतल्या त्यात ब्राह्मणाचा शाप खोटा होणार नाहीं व शापामुळे का होईना, पण आपणास पुत्रलाभ होणार याबद्दल दशरथ राजाला समाधान वाटलें. त्या तिघांचा अंत्यविधि उरकून राजा अयोध्येस परत आला व कुलगुरू वसिष्ठांना साद्यंत हकीगत निवेदन केली व त्या प्रीत्यर्थ अश्वमेध केला श्रावणानें मृत्युसमयीं रामनामाचा उच्चार केल्यामुळे दशरथ राजा ब्रह्महत्येच्या दोषापासून मुक्त झाला होता. तरी दैत्यानां तेवढेच निमित्त सापडून त्यांनीं दशरथाचे राज्यांत अवर्षण पाडले. सर्व प्रजा हवालदील झाली. दशरथ राजाला त्यामुळें क्रोध येऊन तो दैत्यांशीं युद्ध करण्याकरितां स्वर्गांत जाण्यास निघाला. रथांतून स्वर्गांत जाण्याची दशरथाला शक्ति होती. मागें लागून कैकईही बरोबर रथांत निघाली. दैत्यांशीं राजाने घोर संग्राम करून वृषपर्व्याला पळविलें, दैत्य गुरू-शुक्राचार्याला जिंकलें, त्याबरोबर त्याचे राज्यांत पर्जन्यवृष्टि झाली. दैत्याचा पराभव केल्याबद्दल देवेंद्राला हर्ष झाला. बृहस्पतीनीं राजाचा गौरव करून राजाला पुत्रप्राप्ती होईल म्हणून 'आशीर्वाद दिला व त्याकरितां विभांडक ऋषीचा पुत्र शृंगऋषी आणवून त्याचे हस्ते पुत्रकामेष्ठी यज्ञ करावा म्हणून आज्ञापिलें. विभाडक ऋषीला ऋष्यशृंग नामक पुत्र मृगीपासून झाला होता, व त्यांला तो वनांत एकातात ठेवीत असे. त्याला अयोध्येस आणण्याचें कर्म महा कठीण होते. त्याकरितां देवेंद्रानें आपल्या अप्सरांची योजना केली व त्यांनीं ऋष्यशृंगाला लालचावून अयोध्येस आणावें असें ठरलें. दशरथ राजा याप्रमाणे दैत्यांवर विजय मिळवून अयोध्येस परत आला.

**इंद्रपुरीचें वर्तमान । सांगे वसिष्ठा कारण ॥**
**कीं इंद्रें बोधिलें मजलागुन । पुत्रकामेष्ठी यज्ञ करा ॥**
**परि तो याग करावा ऋष्यश्रृङ्गास बाहुनी माने ।**
**शक्रवचन गुरुवर्या सांगा हे काय आपणा माने ॥**

वसिष्ठ गुरूंना ते पसत पडले व त्यांनीं यज्ञसामग्री आणविण्यास सांगितली. स्वर्गाहून देवेंद्राने अप्सरा पाठविल्या, त्याची ऋष्यशृंगाला आणण्याकडे रवानगी झाली. विभाडक ऋषींनीं आपल्या पुत्राला जनसंपर्क लागू नये म्हणून दूर निर्जन वनात आपल्या आश्रमात एकांतात ठेविला होता. ऋष्यशृंगानें आपल्या पित्याशिवाय दुसरा कोणीही मनुष्य पाहिला नव्हता; विभाडक ऋषीचा नित्य नियम आपल्या पुत्राला आश्रमांत एकटाच ठेवून अनुष्ठानाला जाण्याचा असे. त्याप्रमाणे ते अनुष्ठानाकरिता गेल्यावर, अप्सरा त्या ठिकाणीं प्राप्त झाल्या. शृंगऋषीने अप्सरांचा तो ताडा पाहिल्यावर तो घाबरून गेला. जन्मापासून बापाशिवाय स्त्रीपुरुष कोणीही पाहिलेले नाहीं, त्यामुळे स्त्रीपुरुष हा भेदही त्याला माहीत नव्हता.

**पद.**

**अप्सरा। यौवन सुंदरा। सोडिती शरा। करिती संधान॥**
**मुनिकुमार जाहला विस्मित त्यां पाहून॥**
**चोरुनि। पाहे तो लपुनि। नेत्र मुरडूनि। चेष्टा युवतींच्या॥**
**भावना उदित मनीं स्नेह करावा त्यांचा॥**
**वाटले तयाला अतिथिगृहा आणुनी॥**
**परि सत्कार कराया धीर होईना मनीं॥**
**ना कधीं। पाहिले नयनीं। पित्यावाचुनि। अन्य जन त्यानें॥**
**पळे वायुगतीने मुरडुनि मृग भावानें॥**

त्याला वाटलें हे कोणी आपल्या पित्याप्रमाणें ऋषीच आहेत. एखाद्या अल्लड भित्र्या मुलाप्रमाणें तो त्यांचेकडे आडून लपून पाहूं लागला. जवळ जाऊन त्यांच्याशीं भाषण करावे, अतिथि सत्कार करावा हें त्याच्या मनांत येई, परंतु पुढें जाण्याची त्याची हिम्मत होईना. जटा वाढलेला, वल्कलें धारण करणारा आपला बापच फक्त त्यानें पाहिलेला. अप्सरांनीं विंचरून बांधलेले केस, अंगावर उंची वस्त्रें व भूषणें व त्यांचे मोहक चेहेरे पाहून तो मोहित झाला. प्रथम दिवसाची एवढीच कामगिरी करून अप्सरा तेथून निघून गेल्या.

ऋष्यशृङ्गाला चैन पडेना. संध्याकाळीं पिता घरीं आल्यावर कोणी ऋषीजन आले होते व बाहेरच्या बाहेर निघून गेले, असें ऋष्यशृङ्गानें त्याला सांगितलें. त्यावर विभाडक ऋषींनीं त्याला सांगितलें कीं, असे कोणी तापसी अतिथि आल्यास त्याचा सत्कार करीत जावा, त्याना भिऊन आश्रमात लपून बसू नये. दुसरे दिवशीं नित्यक्रमाप्रमाणे विभाडक ऋषी अनुष्ठानाला निघून गेले. ऋष्यशृङ्ग कालचे ऋषीजन आज येतील काय म्हणून उत्सुकतेनें पाहात राहिला. इतक्यात अप्सरा तिथें प्राप्त झाल्या व ऋष्यशृङ्गाला लोभविण्याचा प्रयत्न करू लागल्या.

पद

अप्सरा मुनीवरि नयन शरा फेंकिती ।
जणुं काय भिल्लिणी हरिण धरूं पाहती ॥
हा मेघ वर्षिला जाऊन खडकावरी ।
कोठून हरळ उगवेल बिजाविण तरी ॥

अप्सरा आपल्या कर्मांत प्रवीण होत्या. आजपर्यंत त्यांनीं कित्येक महान्-तपस्वी ऋषींना भुलवून त्याचा व्रतभंग केला होता. परंतु ऋष्यशृङ्गासारख्या अनभ्यस्त व अल्लड मुलावर त्यांच्या नेत्रकटाक्षांचा परिणाम होईना. तेव्हां त्या त्याच्याजवळ जाऊन सर्वजणींनीं त्याला घेरून धरला. ऋष्यशृंग आपल्याप्रमाणें हेही ऋषीजनच आहेत, असें वाटून तो विचारूं लागला.

पुसे शृंग ऋषी कोठून तुम्हीं हो आलां । मशीं बोला ॥
अभ्यास वेदविद्येचा कितिकसा केला । तुम्हीं वहिला ।
उपनिषद भाग कोणता तुम्हीं पाहिला । हें मजला ॥
साकल्य करावें कथन हीच विनती ।
गणुदास म्हणे भास्करा कळे न रात्र ती ॥

सूर्याला जशी रात्र माहीत नाहीं, तसें या बिचाऱ्याला ऋषी, वेदविद्या, उपनिषदें याशिवाय जगाची माहिती नाहीं. त्यानें प्रश्नाला सुरवात केली कीं, तुम्हीं कोठून आलां, तुमचा आश्रम कोणता, वेदाभ्यास किती

झाला, उपनिषदे कोणतीं पाहिलीं. अप्सरा हजरजबाबीच होत्या. त्यांनीं सांगितले,

### ओवी

तारुण्याश्रमीं ऋषी मन्मथ । रतिसंग हा वेद सत्य ।
श्रृङ्गारोपनिषदा सहित । झाला आम्हां पढविता ॥

आम्हीं तारुण्याश्रमीं ऋषी आहोंत, मन्मथ हा आमचा गुरु व तो आम्हाला रतिसग नावाच्या वेदाची व श्रृङ्गार उपनिषदाची संथा देत असतो. ऋष्यशृङ्गाला वाटले हीं नवीनच वेद व उपनिषदें आहेत. त्यानें हीं नावें कधीं ऐकलीं नव्हतीं हे ऋषीकुमार फारच विद्वान आहेत, असे त्याला वाटलें. रतिसंग वेदाची एक ऋचा म्हणण्यास त्याने सांगितलें, त्या सरसें अप्सरानीं वीणा झणत्कारून एक मधुर गायन म्हणून दाखविले. ऋष्यशृङ्ग हा मृगीपुत्र असल्यामुळे नैसर्गिक नादप्रिय होता, त्यामुळें गायन श्रवणानें तो फार लुब्ध झाला. त्याला प्रत्येक गोष्टींत नाविन्य दिसूं लागले. तुमचीं नावें काय, तसेंच तुमच्या वक्षस्थलावर हीं गलाडे कसलीं, असे प्रश्न विचारूं लागला.

### श्लोक

गलांड ऋषी आमुची जगिं प्रसिद्ध नामाविधा ।
आम्हीं निबिड काननीं वसत जाण नाहीं कदा ॥
मृगाजिन बसावया तुजप्रति, आम्हां मंच तो ॥
उभा तुजपुढें हरि, अमुचिया पुढें काम तो ॥

तुझ्या मस्तकावर शृंग असल्यामुळें जसे तुला शृंगऋषी म्हणतात, तसें आम्हांला गलाडामुळें गलांडऋषी म्हणतात. आम्हीं तुझ्यासारखे वनवासी नसून शहरात प्रासादांत राहतों; आम्हीं मृगचर्मावर बसत नाहीं. आम्हाला बसण्याकरिता मऊ गाद्याचे मंचक असतात. एकीनें त्याला कस्तुरीचा सुवास दाखविला. हें काय म्हणून विचारलें तेव्हां सांगितलें कीं, ही आमच्या नगरांतील माती आहे. एकीनें त्याला शर्करेचा लाडू खावयास दिला व सांगितलें आमच्या बागेतील हे एक फळ आहे. अशा रीतीनें कामुक चेष्टा करून त्याला

पूर्ण मोहीत करून सोडले. ऋष्यशृंग आपला आश्रम, स्नान संध्या, जपध्यान, गमनागमन सर्व विसरला व अप्सरांच्या पूर्ण आधीन होऊन त्यांच्या समागमे तो अयोध्येस आला. अप्सरांच्या कामगिरीबद्दल दशरथ राजाला परम आल्हाद झाला. ऋष्यशृंगाला आगला परंतु त्यानंतर विभाडक ऋषींचें संकट उभें होतेंच. विभाडक ऋषी क्रोधाविष्ट होऊन पुत्राचा शोध करीत येतीलच, तेंव्हां त्याच्या क्रोधशमनार्थ दशरथ राजाने आपला स्नेही शांतन याची कन्या शांतना ऋष्यशृंगाला अर्पण करण्याची योजना केली. विवाहाची सिद्धता केली, सर्व नगर गुढया तोरणें उभारून शृंगारलें व विभांडक ऋषींना मूळ पाठविले. परंतु ऋषी त्या पूर्वींच आश्रमांतून पुत्रशोधार्थ निघाले होते, ते अयोध्येत आले. पाहातात तों अयोध्या नगरी ध्वजापताकांनीं शोभिवंत केली होती. तें पाहून त्याना आश्चर्य वाटलें कीं, माझ्या पुत्राला राजानें येथें फसवून आणले व येथे हा उत्सव कसला चालला आहे. त्यानें एका मार्गस्थाला विचारलें कीं, हा समारंभ कसला आहे ? त्यावर तो म्हणाला,

### ओवी

**ऐक मुनिवरा वृत्तांत । ऋष्यशृंग मृगीसुत ॥**
**शांतन कन्या त्यासी देत । सोहळा होत असे लग्नाचा ॥**

आपल्या पुत्राचें लग्न होत आहे हें ऐकून विभांडक मुनीचा क्रोध मावळून तो संतोषीत झाला व लग्नमंडपाकडे आनंदानें निघाला. वसिष्ठ गुरुनीं व दशरथ राजानीं त्यांना पाहिल्याबरोबर ते सामोरे गेले. दशरथ राजा त्यांचे चरणीं लागला व त्यांना मंडपांत आणून त्यांचे मधुपर्क विधीनें षोडशोपचारें यथाविधि पूजन केलें. ऋषींनीं प्रसन्न होऊन राजा मी तुझें काय प्रिय करावें म्हणून विचारलें. तेंव्हां आपल्या पुत्राकडून पुत्रकामेष्टी याग करवावा अशी याचना केली. यागाची तयारी झाली. कुलगुरु वसिष्ठ ऋषी, विभांडक ऋषी व ऋष्यशृंग या तिघांनीं यज्ञास आरंभ केला. शास्त्रोक्त यज्ञकुंड वेदिका स्थापून परिस्तरण करून अग्नि स्थापन केला. यथासांग यज्ञ झाल्यावर [illegible]

दिंडी

वन्हि तेथें कुंडांत प्रगट झाला ।
पाहुनीयां सन्नीध भूपतीला ॥
आशिर्वादा देऊनी प्रसादासी ।
केली आज्ञा द्यावया तो स्त्रियांसी ॥

अग्निकुंडात देदीप्यमान यज्ञपुरुष प्रगट झाला व त्यानें पायसपात्र प्रसाद म्हणून दिले व तो संपूर्ण यज्ञपुरोडाश राजपत्न्याना विभागून द्यावा, म्हणजे पुत्रप्राप्ती होईल असा आशीर्वाद दिला, व तत्काळ त्याचें प्राशन करावें असें सांगून तो अदृश्य झाला. यज्ञपुरोडाश विलंब न करिता विभागून राजपत्न्यास भक्षण करण्यास वसिष्ठ गुरूंनीं सांगितले.

फलं मूलं तथा तीर्थं प्रसादो राघवस्यच ।
शीघ्र मेवानुसेवेत विलंबः कार्यनाशकः ॥

फळ, मूळ, तीर्थ, प्रसाद ह्याचे सेवन विलंब न करितां करावें नाहींतर कार्यनाश होतो, म्हणून वसिष्ठानीं परब्रह्म नावाचा पहिला भाग कौसल्येला दिला, भजनोत्तम नावाचा दुसरा भाग सुमित्रेला दिला व परमधर्म नांवाचा तिसरा भाग कैकयीला दिला. पण कैकयीला मी राजाची लाडकी हा अभिमान. आपणास प्रथम भाग न मिळता तिसरा मिळाल्याबद्दल तिला क्रोध आला व ती वसिष्ठाजवळ मला ज्येष्ठ भाग मिळाला पाहिजे म्हणून हट्ट घेऊन बसली. वसिष्ठानीं तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, पण ती ऐकेना. कौसल्येनें व सुमित्रेने पिंड प्राशन करण्यापूर्वी शुद्धाचमन केलें, पण कैकयी राजाचे तोंडाकडे पाहात राहिली. प्रसाद भक्षणास विलंब झाल्यामुळें तिच्यावर संकट ओढवले. पूर्वी एका अप्सरेला शाप होऊन ती घार झाली होती व दशरथ राजाच्या पुत्रकामेष्टी यज्ञांतील पुरोडा मिळविला म्हणजे तूं शापमुक्त होशील असा तिला उःशाप मिळाला होता. ती घार अनुकूल काल येण्याकरितां टपूनच बसली होती. आकाशांतून पुरोडाशाचे तीन विभाग झालेले तिने पाहिले. कौसल्या शुद्ध पतिव्रता, सुमित्रा शुद्ध सात्विकता. तेव्हां त्या

दोघींच्या भागावर झडप घालण्याची घारीला हिंम्मत होईना. कैकयी क्रोधायमान होऊन हातावर पुरोडाश घेऊन राजाकडे पाहात होती.

पद

मी राजाची असुन लाडकी श्रेष्ठ भाग सवतिला ।
कसा दिला कैकयिनें म्हणुनी पिंडचि नाकारिला ॥
साधुनी संधि घारिनें झडपुनि पिंड पळविला ।
मग दोहींतून अर्धाअर्धा देऊन लाड पुरविला ॥

घारीने संधि साधली. तिने कैकयीच्या तोंडावर पंख फडफडविले, नखाने तिचा हात ओरबाडला व हातावरील पिंड मुखांत धरून ती गगनांत उडून गेली. हा प्रकार पाहून एकच हाहाःकार उडाला. घारीवर शरसंधान केलें, पण ती आकाशांत गुप्त झाली. पंखांची झड लागल्यामुळे कैकयी जमिनीवर उलथून पडली व पुरोडाश गेल्यामुळे आक्रोश करूं लागली यज्ञमंडपांतील मंडळी आपसांत कुजबुजूं लागली कीं, गर्वाचे व हट्टाचे फळ असेंच मिळावयाचें. शेवटीं कौसल्येला तिची दया येऊन तिने कैकयीची समजूत घातली कीं, तुझ्या मनांत सवतिमत्सराने ठाणें दिलें आहे, परंतु वास्तविक पाहिलें तर आपण तिघी एकत्र. आपल्या तिघींचें अहेवपण एक, नाथ एक, मग तूं का उगाच मत्सर करत्येस. तुझा भाग गेल्यामुळें आम्हांलाच पुत्र झाले तर आम्हांला सुख का लागणार आहे. तुझ्या हट्टानें तूं आपला भाग गमावलास, आतां मी तुला माझ्या भागांतील अर्धा भाग देतें. तें पाहून सुमित्रेनेही आपल्या भागांतील अर्धा भाग देण्याचें कबूल केलें. कैकयीचें समाधान झालें. तिन्हीं राजपत्न्यानीं याप्रमाणें यज्ञपुरोडाश भक्षण केल्यावर त्या गर्भवती झाल्या. यथाकालीं राजानें त्यांचे पुंसवनादि संस्कार करून तो डोहाळे विचारूं लागला. प्रथम तो कौसल्येचे महालांत गेला. प्रत्यक्ष भगवान तिच्या उदरीं आलेले तेव्हां ती रामरूप बनली, व डोळे मिटून स्वस्थ पडली होती. तिच्या अंगावर आलेलें तेज राजाच्या नेत्रांना सहन होईना. राजानें तिला हाका मारिल्या, हालवून पाहिली तरी प्रत्युत्तर मिळेना. कौसल्येनें डोळे

उघडले तों सर्व सृष्टि तिला राममय दिसूं लागली. ती स्वतःला विसरली, राजाला विसरली; राजा चिंताक्रांत झाला व कौसल्येला एकेक आठवण देऊं लागला. आपल्या लग्नाला रावणाने विघ्न केलें तरी--इतके वाक्य दशरथाच्या तोंडून निघाले मात्र तों कौसल्या एकदम उठून धनुष्य आणा, वानराना बोलवा मी राक्षसाचा वध करतों, असे आक्रंदूं लागली.

पद

साह्य करुनि वानरांस रावणाप्रति ।
वधिन कुंभकर्ण कुठे दाव निश्चिती ॥
त्राटिकेस मर्दुनिया वधिन वालिला ।
निर्दाळिन असुर मुक्त करिन साधुला ॥

दशरथ राजा कौसल्येचा तो आवेश पाहून घाबरून गेला. त्याला वाटलें आपल्या गर्भवती स्त्रीला खास पिशाच्चाने पछाडले तसाच तो पळत वसिष्ठ गुरूंकडे गेला.

आर्या

दशरथ पळून गेला कौसल्या त्यजुनि विनय हें वदतां ।
सांगे वसिष्ठ गुरुसी ज्येष्ठेसी भूत लागलें आतां ॥

कौसल्येचे उदरीं प्रत्यक्ष भगवान अवतरणार असून हे विघ्न कसें उत्पन्न झाले, याचे वसिष्ठमुनींना आश्चर्य वाटले. राजाला बरोबर घेऊन ते कौसल्येचे महालांत गेले व कौसल्येचे ते रूप पाहून, खरा प्रकार त्यांनीं ओळखला. कौसल्येची मूर्ती साक्षात् राम स्वरूपांत वसिष्ठ मुनीना दिसली. दोन्हीं कर जोडून त्यांनीं प्रार्थना केली.

श्लोक

आद्यंत तूं मुररिपो जगचालकारे ।
तूं पूर्णब्रह्म भगवन् मधुसूदनारे ॥
संतादिकां तुजविणें न जगीं विसावा ।
तुभ्यं नमो भगवते रघुराज देवा ॥

राजाला हे गौडबंगाल कांहीं समजेना. त्याला वाटलें आपल्या गुरुमहाराजानाही पिशाच्याने झडपलें. गुरुमहाराजांना विचारावें तों तेही रामस्वरूपीं दंग झालेले. राजा नुमतांना मोठमोठ्याने हाका मारूं लागला. तेव्हा वसिष्ठमुनी त्याला म्हणाले, असा वेड्यासारखा घाबरून काय गेलास. प्रत्यक्ष भगवान् तुझ्या कुलात अवतार घेत आहेत.

पद

भूत नव्हे हें जाण ॥ नृपारे ॥ भूत० ॥
पूर्णब्रह्म जो ईश सनातन । होत तुझे संतान । नृपारे ॥ १ ॥
नारायण अघशमन दयानिधि । हाच विकल्प न मान । नृपारे ॥ २ ॥

याप्रमाणें राजाला सांगून त्यांनीं कौसल्येला म्हणजे पर्यायाने श्री रामचंद्राला प्रदक्षणा घातली व रामजन्माचा काल नजीक आला हे जाणून दशरथाला घेऊन ते महालाबाहेर आले. इतक्यांत महालांत जिकडे तिकडे तेज फांकले. तें तेज सहन न होऊन दासी मूर्छित झाल्या आकाशांत देवांच्या विमानांची दाटी झाली, व देवांनीं पुष्पवृष्टी केली. श्री सविता सूर्यनारायण माध्यान्हीं आला.

आर्या

पुनर्वसूस वसंतीं नवमीला चैत्र शुद्ध पक्षांत ॥
माध्यान्हिस रवी येतां झाला अवतीर्ण जानकीनाथ ॥

अयोनीसंभव श्रीरामचंद्राची चतुर्भुज मूर्ति कौसल्येपुढे उभी राहिली. कौसल्येला आश्चर्य वाटलें. पोट दुखणें नाहीं, बाळतपणाच्या वेणा नाहींत, पण गर्भ नाहींसा होऊन श्रीरामचंद्र जन्माला आले. कौसल्या म्हणाली, देवा अशा प्रकारें जर आपण अवतार घेतला तर आपण माझ्या उदरीं जन्म घेतला हे जगांत कोण मानील. हें ऐकून प्रभु रामचंद्रानीं लगेच बालरूप धारण केलें व कौसल्या मायावश झाली. महालांतील तेज लय पावलें. दासी शुद्धीवर आल्या व कौसल्येला पुत्रप्राप्ती झाल्याची बातमी त्यांनीं बाहेर जाऊन राजाला सांगितली. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला; नौबती, भेरी

झडूं लागल्या, हत्तीवरून शर्करा वांटली. कौसल्येने रामचंद्राला पाळण्यांत घातले व पाळणा म्हणण्यास सुरवात केली.

पाळना

बाळा जो जो रे । रघुराया । भक्तवत्सला सदया ॥ बाळा० ॥
त्रिभुवन पाळणा । तुजसाठीं शशिवदना ॥
निद्रा करी बारे अघशमना । रामा राजिवनयना ॥ बाळा० ॥
ऋक यजु साचार । पाळण्याचे खुर ॥
अठरा पुराणें निर्धार । उपनिषदे विणकर ॥ बाळा० जो० ॥
गादी भावाची । त्यावरती । उशि सोज्वल भक्तिची । रामा
घातिलि म्यां । मधे साची । शाल वैराग्याची ॥ बाळा० ॥
शांति ही दोरी । घेऊनियां । मी बत्र आपुले करीं । हलवित
तुजलागीं । रघुराजा । दासगणूला तारी ॥ बाळा० ॥

दशरथ राजाने पुत्रमुख पाहिले. त्याने पुत्राचें जातककर्म केलें व ब्राह्मणाना अगणित द्रव्य देऊन पुत्रमहोत्सव केला.

आर्या

धन्य अयोध्या नगरी कौसल्या धन्य धन्य दशरथ तो ।
जन्मास राम आले दासगणू हा तदीय पद नमितो ॥
॥ जय जय रघुवीर समर्थ ॥

बुवानीं वरीलप्रमाणें कीर्तन करून रामजन्मोत्सव साजरा केला. रामजन्म झाल्याबरोबर सर्व मंडळींनीं गुलाल उधळला, त्या वेळीं समाधि मंदिराचें वातावरण संधिप्रकाशाच्या रक्तवर्ण आकाशाप्रमाणे शोभूं लागले. समाधीची आरती झाली व प्रसाद ग्रहण करून सर्व श्रोते जन स्वस्थानीं गेले.

दोन प्रहरीं भोजनसमारंभ झाला. श्री साईनाथ महाराजानीं समाधि घेतल्यापासून आजपर्यंत समाधिपुढें मंदिरांत पंगत कधीं बसली नव्हती, परंतु यंदा महाराजानीं समाधि पुढें पानें मांडण्यास सांगितली. मध्यभागीं महाराज बसले होते व दुतर्फा भक्तमंडळी भोजनास बसली होती. श्रीसाईनाथ महाराज विद्यमान असतांना केव्हा केव्हां मशिदींत भोजन समारंभाचा जो अपूर्व

देखावा पाहाण्यांत येत असे त्याच तऱ्हेचा हा देखावा समाधि मंदिरात दिसला. त्या वेळीं जसे निंबोरापुढे श्री स्वतः बसून बाजूला भक्तमंडळींना भोजनास बसवीत असत; त्या प्रमाणे समाधि स्वरूपात श्री मध्यस्थानीं असून दुतर्फा भक्तमंडळी बसली होती.

श्रीनृसिहबावा महाराजांनीं बरोबर ७०।७५ निरनिराळ्या जातींचे सर्प आणले होते. त्यांत दोन मोठे फणीधर नाग होते व दोन नागिणी होत्या. महाराजाचे सर्प पाहाण्याची सर्व मंडळींची उत्कंठ जिज्ञासा होती, व संध्याकाळीं ती पूर्ण करण्याचे महाराजांनीं कबूल केलें होते. त्या प्रमाणें तिसऱ्या प्रहरचें ऊन खालीं झाल्यावर महाराजांनीं मंडळींना समाधि मंदिरावरील गच्चीवर बोलाविले, व सर्पांची सरबराई कशी ठेवावी लागते हे सर्वांना पाहाण्यास सांपडलें. पाणी भरून तीन बादल्या आणल्या होत्या त्यांत प्रथम सर्व सर्प टाकले. गारुडी ज्या प्रमाणे टोपल्यांत सर्प ठेवतात त्याचप्रमाणे हे सर्व ठेवलेले होते. उष्णतेने त्रस्त झालेल्या त्या सर्पांना थंडपाण्याचें स्नान फार मानवलेलें दिसले. तोंडाशिवाय सर्व शरीर पाण्यांत ठेवून ते आनंदांत डुलत होते. बादल्या सभोंवार सर्व मंडळी घोळक्यानें उभी राहिली होती. काय चमत्कार पाहा, एक लहानसें किरडु कोठे निघालें तर मनुष्याची कोण धांदल उडते, पण इथें तर ७०।७५ जहरी सर्प असून मंडळी दोन हातावर स्वस्थ चित्तानें उभी होती. पण त्यांचे हें चित्तस्वास्थ्य सर्प बादल्यांतून बाहेर काढल्यावर मात्र टिकलें नाहीं. सर्पांनीं बाहेर निघाल्याबरोबर स्वेच्छाचार वर्तनाला सुरवात केली व मंडळीची पळापळ सुरू झाली. तितक्यांत एका ९।१० वर्षाच्या मुलाला सर्प चावला व तो ओरडूं लागला. भिऊं नकोस, कांहीं होणार नाहीं म्हणून महाराजांनीं त्याचे शांतवन केलें, व लवकरच सर्व सर्प पकडून त्याना त्यांच्या निवासस्थानांत अडकवून टाकलें. एक नागीण घेऊन महाराजांनीं तिचे तोंड उघडलें, व सर्पाचे दांत कसे असतात, विषारी दांत कोणते, विषाच्या पिशव्या कुठें असतात वगैरे माहिती मंडळींना दिली. कोणी हाताला चाववून घेत असल्यास, विषप्रयोग कसा होता तें आपण दाखवूं असे महाराजांनीं म्हटल्याबरोबर एक मुंबईकडील गृहस्थ सर्प चाववून घेण्यास तयार

विषारी दात ( Fangs ) कायम आहेत अशी हमी दिली. सर्प चाववून घेण्याकरितां अंधेरीकडील एक गृहस्थ तयार झाले. सर्प नुकताच पकडून आणल्यामुळें चवताळलेला होता, त्यामुळे त्याला चावण्याची संधि मिळाल्याबरोबर तो खूपच कडकडून चावला. त्या गृहस्थाचे सर्व मनगट रक्तबंबाळ झाले. विषारी दात, त्यातून बाहेर आलेले विष वगैरे महाराजांनी पूर्वोक्त-रीतीने सर्वांना दाखविले. हा प्रयोग पाहून महाराजांच्या अलौकिक शक्तीबद्दल बहुतेक सर्वांची खात्री झाली.

उत्सवाच्या कार्यक्रमाप्रमाणे सायंकाळीं निशाणाची व रथाची मिरवणूक निघून मामुली वहिवाटीप्रमाणे ती यथासांग पार पडली. रात्रीं समाधि मंदिरांत नांदेडचे रा. देवीदास लक्ष्मण महाजन यांचे सुश्राव्य कीर्तन झालें. कीर्तनकाराचा पेषा नसून रा. महाजनांचे कीर्तन फार चांगलें झालें. त्यानंतर शेजारती होऊन नवमीचा कार्यक्रम संपला. द्वादशीपर्यंत कार्यक्रमाप्रमाणें सर्व समारंभ, कीर्तनें, कुस्त्या वगैरे वेळेवर होऊन द्वादशीला काला झाला व उत्सव समाप्ती झाली. या सालीं जत्राही चांगला भरली होती. दारूकाम प्रेक्षणीय होतें. एक रात्रीं मशीदीपुढील पटांगणांत व एक रात्रीं गांवाबाहेर वेशीच्या पलीकडे शेतांत दारू काम सोडण्यात आले. उत्सवाप्रीत्यर्थ कोपरगांवचे मामलेदारसाहेब, मुन्सफसाहेब फौजदारसाहेब, वगैरे अधिकारी मंडळ आलें होतें.

या समारंभात, निसर्गसिद्ध पंचमहाभूतांतील प्रखर महाभूत जो वन्ही त्यावरही सत्पुरुषांचा अधिकार कसा चालतो, याची प्रचिती महाराजांनीं आणून दिली. शिर्डीस येण्यापूर्वी महाराजानीं मोंगलाईंत कळमनुरीस महायज्ञ केला होता. त्या यज्ञास महाराजांचे निमंत्रणावरून बुवा गेले होते. यज्ञ समाप्ती झाल्यावर महाराजांनीं तेथे 'आहाड' केला होता. हा आहाड म्हणजे एक मोठा चर खणून त्यांतील रसरसीत निखाऱ्यांवरून लोकांनीं चालत जाणे. कळमनुरीला हा चर ४० हात लांब खणला होता. शिर्डीच्या लोकांनाही हा प्रयोग दाखवावा म्हणून बुवानीं महाराजांना विनंति केली. त्याकरितां समाधि मंदिरा बाहेरील उत्तरेकडील पटांगणांत ७ हात लांब व सुमारें ४ हात रुंद व २ हात खोल असा एक चर तयार करवून त्यांत पुष्कळसीं लांकडें पेट-